पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७० ■ शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com







## राजकारणात खळबळ!

# दोन्ही राष्ट्रवादीची चर्चा फिस्कटली...

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही राष्ट्रवादीचे जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्याने चर्चा फिस्कटली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीने महाविकास आघाडीच्या साथीनेच लढण्याचा निर्णय घेत



काँग्रेस आणि उद्धवसेनेशी चर्चा सुरू केली आहे. पुणे महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही पक्षांच्या आघाडीसाठी शरद पवार गटाचे नेते माजी महापौर अंकुश काकडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष विशाल तांबे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बारामती होस्टेलवर शुक्रवारी रात्री भेट घेतली. त्यावेळी जागावाटप आणि घड्याळ की तुतारी चिन्हावर लढायचे, याविषयी चर्चा झाली. शरद पवार गट तुतारी चिन्हासाठी ठाम होता. केवळ ३५ जागा देण्याचा प्रस्तावही शरद पवार गटाला अमान्य होता. त्यामुळे चर्चा फिस्कटली. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाशी चर्चा फिस्कटल्यानंतर शरद पवार गटाने तातडीने महाविकास आघाडीच्या घटक पक्षांशी चर्चा सुरू केली आहे. काँग्रेस, उद्धवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या तिन्ही पक्षांची उशिरा रात्री संयुक्त बैठक झाली.

# नववर्षात वाजणार जि. प., पं. स.चा बिगुल!

## पहिल्यांदा १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांची निवडणूक

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**सोलापूर :** राज्यातील ३२ जिल्हा परिषदांपैकी १२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पैकी १२५ पंचायत समित्यांची निवडणूक २१ दिवसांत संपविली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मिनी मंत्रालयाचा बिगुल जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात वाजणार आहे. ८ जानेवारीपूर्वी या निवडणुकीची आचारसंहिता लागू शकते, असे राज्य निवडणूक आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील उमेदवारांचे आरक्षण काढताना २० जिल्हा परिषदांनी व २११ पंचायत समित्यांनी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्यांची निवडणूक थांबविली आहे. आता पहिल्यांदा आरक्षण मर्यादेचे पालन केलेल्या १२ जिल्हा परिषदांचीच निवडणूक होणार आहे.

# जानेवारीत तब्बल 16 दिवस बँका बंद!

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**मुंबई :** २०२६ वर्ष सुरू व्हायला अवघे काही दिवसच बाकी आहेत. याच पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२६ वर्षासाठीचे बँक सुट्ट्यांचे अधिकृत कॅलेंडर जाहीर केले आहे. या कॅलेंडरनुसार वर्षाच्या पहिल्याच महिन्यात म्हणजे जानेवारीत बँका तब्बल १६ दिवस बंद राहणार आहेत. मात्र, या सर्व सुट्ट्या सगळीकडे सारख्या नसल्याने एकाच वेळी देशभर बँका बंद राहणार नाही.राज्यांनुसार आणि तेथील स्थानिक सण-उत्सवानुसार बँका बंद असणार आहेत.त्यामुळे, जानेवारी महिन्यात कोणतेही महत्त्वाचे बँकिंग काम असेल, तर ग्राहकांनी आपल्या शहरातील बँक सुट्ट्यांची यादी आधी तपासणे महत्त्वाचे ठरते. जानेवारी २०२६ मध्ये सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील बँका नवीन वर्ष, स्वामी विवेकानंद जयंती, बिहू, मकर संक्रांती, नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती आणि प्रजासत्ताक दिन अशा विविध सण-उत्सवांमुळे बंद राहणार आहेत.









२

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

## माहुलीत वडील व मुलाने केले विष प्राशन ; उपचारादरम्यान ३१ वर्षीय मुलाचा मृत्यू

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**दर्यापूर :** तालुक्यातील माहुली ( धांडे ) गावात क्षुल्लक कौटुंबिक वादातून हातमजुरी करणाऱ्या पिता-पुत्राने गुरुवारी दुपारी विष प्राशन केले. दरम्यान उपाचारासाठी अमरावती येथे नेत असताना वाटेतच ३२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. उमेश रामप्रसाद सोळंके (वय.३२ ) असे युवकाचे नाव आहे. तर वडील रामप्रसाद चंद्रभान सोळंके (वय.६५) यांची प्रकृती स्थिर आहे. दोघेही रा.माहुली ( धांडे ) येथील आहे. घटनेच्या दिवशी गुरवारी दुपारी वडील रामप्रसाद व मुलगा उमेश यांच्यात शेतीच्या वादातून शाब्दिक वाद झाला. दरम्यान दोघांनीही विष प्राशन केले. कुटुंबातील सदस्यांनी तातडीने उपचारासाठी दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात आणले. यावेळी प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही अमरावती येथे नेत असताना वाटेतच मुलगा उमेश सोळंके यांचा मृत्यूं झाला.

# मनपा निवडणुकीच्या तोंडावर उबाठा गटाला आ. रवी राणा यांचा दणका

अमरावती महापालिका निवडणूक

-उबाठा गटातील माजी नगरसेवक भारत चौधरी यांचे पुत्र सुरज भारत चौधरी यांच्यासह ६५० उबाठा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचा युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जंगी प्रवेश

-आ. रवि राणा यांनी सर्व नविन प्रवेश घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन केले स्वागत

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती :** अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून उबाठा गटाला जोरदार धक्का बसला आहे. उबाठा गटातील सक्रिय कार्यकर्ते व पदाधिकारी व माजी नगरसेवक भारत चौधरी यांचे पुत्र सुरज भारत चौधरी यांच्यासह तब्बल ६५० कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जंगी प्रवेश केला आहे. या सामूहिक प्रवेशामुळे अमरावतीतील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली आहेत.

या प्रवेश सोहळ्यात आमदार रवी राणा यांनी नव्याने पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक स्वागत केले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.



यावेळी बोलताना सुरज भारत चौधरी यांनी आमदार रवी राणा यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले की, ‌‌आ. रवी राणा हे कार्यकर्त्यांची खरी जाणीव ठेवणारे नेते आहेत. ते कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक देतात, त्यांचे प्रश्न समजून घेतात आणि वेळप्रसंगी ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहतात. त्यामुळेच आम्ही शेकडो कार्यकर्त्यांसह युवा स्वाभिमान पार्टीमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.आमदार रवी राणा यांनीही नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करताना सांगितले की, युवा स्वाभिमान पार्टी ही सर्वसामान्य कार्यकर्त्यांची पार्टी आहे. पक्षात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मान, जबाबदारी आणि विकासाच्या कामात सहभाग दिला जाईल. अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी युवकांची ताकद एकत्र करून आगामी मनपा निवडणूक ताकदीने लढवली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रवेशामध्ये अमन सांडे, अजय सांडे, मनोज अग्रवाल, ईश्वर मेश्राम, किरण नाचनकर, जावेद रायलीवाले, संतोष बुंदिले, यश सवाईकर, प्रथमेश माटे, रोशन शेंडे, अरमान पाल, प्रतिक शेगोकार, प्रतिक तायडे, आदित्य वानखडे, अक्षय डोईफोडे, अंकुश खोडेकर, करण तायडे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश या मोठ्या प्रवेशामुळे उबाठा गटाला राजकीय फटका बसला असून युवा स्वाभिमान पार्टीची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली आहे. अमरावती मनपा निवडणूक २०२५ च्या तोंडावर झालेल्या या घडामोडीमुळे येत्या काळात शहरातील राजकारण अधिक रंगतदार होणार, हे मात्र निश्चित आहे.

# नितीन दळवी यांचा सत्कार

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती:** मुंबई येथील उद्योजक नितीन दळवी यांचा गाडगेबाबा सेवा पुरस्कार देऊन सत्कार अमरावतीञ्श्री गाडगे महाराज समाधी मंदिर ट्रस्ट गाडगेबाबा नगर अमरावतीच्या वतीने गाडगेबाबांच्या सेवा संस्थांना विविध प्रकारे सहकार्य करणारे मुंबई येथील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते नितीन जी दळवी यांचा गौरव समाधी मंदिर स्थळ या ठिकाणी संस्थेचे विश्वस्त गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह शाल श्रीफळ पुष्पहार देऊन प्राचार्य अरविंदराव देशमुख यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी व्यासपीठावर ह भ प श्री संदीप गिरी महाराज, डॉक्टर



राजकुमार लंगडे ह भ प भरत महाराज रेडे संस्थेचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे ,गजानन देशमुख दर्यापूर, मेळघाटचे रमेश तोटे, सुधीर धोंगडे, अतुल रेडे श्री ढोरे सर आधी उपस्थित होते उपस्थित सर्वांनी नितीनजी दळवी यांना त्यांच्या पुढील सेवा कार्याला शुभेच्छा दिल्या नितीनजी दळवी यांचे सेवा कार्य अमरावती जिल्ह्यातील गाडगे महाराज विविध संस्थेच्या विद्यार्थ्यांना साहित्य एवढेच नाही तर इतरही दर्यापूर तालुक्यातील नवे चांदूरबाजू तालुक्यातील सुद्धा विविध शाळांना शालेय साहित्याचे वाटप दरवर्षी संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख सागर देशमुख यांच्या माध्यमातून त्या त्या संस्थेच्या परिसरात जाऊन त्या विद्यार्थ्यांना शालेय वाटप ते प्रामुख्याने करतात व त्यामुळेच आज त्यांचा आज सत्कार गुण गौरव करण्यात आला आहे.

## विद्यापीठात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची जयंती साजरी



प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. भगवान फाळके, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, मुंबई विद्यापीठातील भाषा अभ्यासक व संशोधक डॉ. दिपक पवार तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याबद्दल माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे यांनी दिली.

## वीर बाल दिनानिमित्त साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांना अभिवादन

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती :** वीर बाल दिवसानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज गुरु गोविंदसिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांच्या प्रतिमेस जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

शिखांचे दहावे व अखेरचे गुरू असलेले गुरु गोविंदसिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांनी दिलेल्या बलिदानाच्या सन्मानार्थ २६ डिसेंबर हा दिवस सन २०२२



पासून दरवर्षी वीर बाल दिवस म्हणून साजरा केला जातो.

बाल वयातच या बालकांनी शिख संप्रदायाचा सन्मान व अस्मिता राखून आपले बलिदान दिले. त्यांच्या गौरवार्थ व त्यांनी केलेल्या समर्पणाच्या सन्मानार्थ दरवर्षी २६ डिसेंबर हा दिवस देशभर वीर बालदिन म्हणून साजरा करण्यात येतो.

## टपाल विभागात 'डाक जीवन विमा' प्रतिनिधींची भरती; २० जानेवारीला मुलाखती

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती:** भारतीय डाक विभागाच्या अमरावती विभागांतर्गत डाक जीवन विमा विना मध्यस्थी नेमणूक करण्यात येणार आहे. या पदासाठी इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी २० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग यांनी केले आहे. या भरतीसाठी उमेदवाराचे वय १८ ते ५० वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक असून, किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण (किंवा समतुल्य) असणे अनिवार्य आहे. उमेदवारांची निवड ही मुलाखतीतील कामगिरी, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व आणि विमा क्षेत्रातील प्राथमिक ज्ञानावर आधारित केली जाईल. निवड झालेल्या उमेदवारांना ५ हजार रुपयांची सुरक्षा अनामत रक्कम (NSC किंवा KVP स्वरूपात) जमा करावी लागेल. प्रशिक्षणांनंतर उमेदवारांना सुरुवातीला तात्पुरता परवाना दिला जाईल. मात्र, नियुक्तीच्या तीन वर्षांच्या आत आयआरडीएची परवाना परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे, त्यानंतरच हा परवाना कायमस्वरूपी केला जाईल. ही नियुक्ती पूर्णपणे कमिशन तत्त्वावर असेल. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी आपले मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि पासपोर्ट आकाराचे फोटो घेऊन प्रवर अधीक्षक कार्यालय, कॅम्प, अमरावती - ४४४६२० येथे प्रत्यक्ष उपस्थित राहावे. निवड प्रक्रियेबाबतचे अंतिम अधिकार भारतीय डाक विभागाने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

## यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारासाठी प्रवेशिकांचे आवाहन; ३० जानेवारीपर्यंत मुदत

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने दिला जाणारा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ साठी लेखक आणि प्रकाशकांकडून प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या प्रथम आवृत्तीच्या पुस्तकांसाठी ही स्पर्धा असून, पात्र साहित्यिकांनी आपल्या प्रवेशिका विहित मुदतीत सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत सन २०२५ च्या पुरस्कारांसाठी प्रवेशिका सादर करण्याचा कालावधी १ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यातील इच्छुकांनी आपल्या प्रवेशिका आणि पुस्तके या विहित कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे जमा करणे आवश्यक आहे. ३० जानेवारीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज आणि पुस्तके खास दूतामार्फत किंवा टपालाने १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, प्रभादेवी, मुंबई यांच्या कार्यालयाकडे पाठविली जाणार आहेत. मराठी साहित्यातील विविध प्रकारांमधील उत्कृष्ट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाकडून दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो.

## शहरात कलम ३७ नुसार प्रतिबंधात्मक आदेश लागू

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती:** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. २८ डिसेंबर ते दि. ११ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

## नायलॉन मांजा वापरल्यास पालकांना दंड;

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अमरावती:** मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंग खेळण्यासाठी नायलॉन मांजा वापरणाऱ्यांवर आणि त्याची विक्री करणाऱ्यांवर आता मोठी कारवाई होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नायलॉन मांजा संदर्भात अत्यंत कठोर पवित्रा घेतला असून, वापरकर्ते आणि विक्रेत्यांवर ५० हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंतचा दंड प्रस्तावित केला आहे. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने जाहीर सूचना प्रसिद्ध केली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना मोठा दंड भरावा लागणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

## युगधर्मा पब्लिक स्कूलमध्ये 'माइंड मास्टर्स खामगाव' स्पर्धा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**खामगाव :** खामगाव येथील सूर्योदय एज्युकेशन सोसायटी संचलित युगधर्मा पब्लिक स्कूल, खामगाव येथे 'माइंड मास्टर्स खामगाव' ही बौद्धिक स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. खामगाव शहरातील हुशार व सुप्त बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने शाळेतर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकला, रांगोळी, जी के क्विझ ,मेहंदी, आणि हस्तकला, गट अ पहिली ते पाचवी आणि गट व सहावी ते दहावी प्रत्येकी तीन बक्षिसे देण्यात आली प्रथम बक्षीस १००१ रुपये स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र, द्वितीय बक्षीस ७५१ रुपये स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र, तृतीय बक्षीस ५०१ रुपये स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आली. यामध्ये खामगाव शहरासोबतच आजूबाजूच्या गावांमधून सुद्धा ५२२ च्या जवळपास विद्यार्थी सहभागी झाले




होते हे विशेष.

या प्रसंगी शाळेच्या ग्रंथालयाचे उद्घाटनही करण्यात आले. आत्मचरित्रे, संदर्भ पुस्तके, कॉमिक्स, शौर्यकथा व कादंबऱ्या अशा विविध प्रकारच्या २५०० हून अधिक पुस्तकांचे ग्रंथालय मान्यवरांच्या हस्ते खुले करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी श्री. वामनराव बंगालभट्टी, उपाध्यक्ष राष्ट्रभाषा ग्रंथालय, खामगाव तसेच श्री. विजय जी कुलकर्णी, मुख्य पत्रकार हे मान्यवर उपस्थित होते. बक्षीस वितरण समारंभात सूर्योदय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांनी पालक व विद्यार्थ्यांचे उपस्थिती व सहभागाबद्दल आभार मानले. यावेळी शाळेचे प्राचार्य श्री. अनिरुद्ध अवचार यांनी युगधर्मा पब्लिक स्कूलमध्ये होत असलेल्या शैक्षणिक प्रगतीबद्दल माहिती देत, विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या हितासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या पहिल्या एआय-आधारित (AI Power) शैक्षणिक साधनांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगिता देशमुख, रेखा राऊत, कांचन लोखंडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. पालकांनी युगधर्मा पब्लिक स्कूलच्या उपक्रमांचे कौतुक करत 'माइंड मास्टर्स स्पर्धेचे विशेष अभिनंदन केले.

## मनसे शहर अध्यक्षपदी आकाश पाटील यांची नियुक्ती

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**खामगाव:** महाराष्ट्र नवनिर्माण सेना खामगांव शहर अध्यक्षपदी आकाश पाटील



यांची नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य उपाध्यक्ष राजुभाऊ उंबरकर व बुलडाणा जिल्हा अध्यक्ष अमित देशमुख यांचे आदेशावरुन तालुकाध्यक्ष डॉ. जयेशराव शालीग्राम सातव यांनी आज २३ डिसेंबर २०२५ रोजी एका पत्रान्वये सदर नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ध्येय धोरणे व कार्यक्रम निष्ठेने राबवून पक्ष संघटन अधिक मजबूत करावे अशी अपेक्षा पत्रात व्यक्त केली आहे. या नियुक्तीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## बुलढाणा रोडवरील अतिक्रमणधारकांचे लाखोंचे नुकसान; सुदैवाने जीवितहानी टळली

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**खामगाव :** मलकापूर शहरात आज दि. २७ डिसेंबर रोजी पहाटे सुमारे अडीच वाजताच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. श्प्-४० ॅण् ५६०८ क्रमांकाच्या भरधाव ट्रकचा चालकावरील ताबा अचानक सुटल्याने ट्रक थेट बुलढाणा रोडवरील रस्त्याकडेला असलेल्या अतिक्रमणांवर आदळला. या अपघातात अतिक्रमणधारकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघात



इतका जोरदार होता की रस्त्यालगत असलेली टपऱ्या, हातगाड्या व साहित्य पूर्णतः उद्ध्वस्त झाले. सुदैवाने ही घटना पहाटेच्या वेळी घडल्याने मोठी जीवितहानी टळली, मात्र संबंधित व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस स्टेशन मलकापूर येथील अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी तात्काळ पंचनामा करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून ट्रक चालकाची चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे बुलढाणा रोड परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रस्त्यावरील अतिक्रमण आणि अवजड वाहनांच्या वेगाबाबत नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.


### ♦ मलकापूरमध्ये भरधाव ट्रकचा ताबा सुटला

शहरातून बुलढाणा रोड ने होत असलेली जड मोठ्या वाहनांची वाहतूकि मुळे बऱ्याचवेळा वाहतुकीचा खोळंबा होताना दिसतो तसेच अपघाताची मालिका सुरूच राहते या नियमित होणाऱ्या अपघातामुळे कित्तेक निष्पाप लोकांचा जीव गेला आहे जड वाहनांची वाहतूक शहरातून नकोच मलकापूर शहरभाहेरून बायपास मार्ग व्हावा हि मागणी पुन्हा नागरीकमधून होत आहे.

## हिंदूवरील अत्याचाराचा निषेध व घुसखोरांवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**खामगाव:** बांगलादेश मध्ये सुरू असलेल्या हिंदूवरील अत्याचाराबाबत केंद्र सरकारने हस्तक्षेप करत त्यांना सुरक्षा द्यावी. तसेच भारतात असलेल्या १ कोटी पेक्षा अधिक बांगलादेशींना तातडीने देशाबाहेर काढावे. अशी मागणी सकल हिंदू समाज व युवा हिंदू प्रतिष्ठान यांच्या वतीने येथील तहसीलदार यांच्या माध्यमातून



राष्ट्रपती, पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांकडे निवेदनाच्या माध्यमातून २६ डिसेंबर रोजी करण्यात आली आहे. सकल हिंदू समाज व युवा हिंदू प्रतिष्ठाण महाराष्ट्र यांच्या वतीने २६ डिसेंबर रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल) यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये आशयाचे नमुद केले आहे की, बांगलादेशात हिंदूवर अत्याचार होत असुन दिपूचंद्र दास या युवकाची निघृण हत्या करण्यात आली. या घटनेचा निषेध करण्यात येत आहे. हिंदू भावना या कृत्यामुळे समाजबांधवांच्या दुखावल्या आहेत. त्यामुळे हिंदूंचे रक्षण करण्यासाठी भारत सरकारने ठोस पावले उचलावी. बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्यात यावी. तसेच दिपूचंद्र दास यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर रोहित पगारिया, योगेश डोईफोडे, मनिष छापरवाल, रविराज पाटील, विनायक निमसे, अमोलसिंह चंदेल, राहुल कळमकार आदिंच्या सह्या आहेत.

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५

http://epaper.citynewssuperfast.com

# न्यू तापडिया नगरातून अकोला शेगांव पायीवारी

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अकोला:** न्यू तापडिया नगरातील संत श्री गजानन महाराज वारकरी मंडळाच्या वतीने ४ जानेवारी रोजी पायीवारीचे आयोजन केले आहे. रविवारी सकाळी ५.३० वा. गजानन महाराज मंदिर, न्यु तापडिया नगर येथून गायगांव, कसुरा, नागझरी मार्गे दुपारी ३ वा. शेगांव येथे वारी पोहोचेल. दर्शन घेऊन नंतर अकोल्याकरीता ५ वा. परतीचा प्रवास सुरू होईल. ज्यांना वारी मध्ये यायचे असेल, त्यांनी ३०/१२/२०२५ पर्यंत संपर्क साधून नोंद करणे अनिवार्य राहील. जे वारकरी पायी चालू शकतील अशांनीच संपर्क साधावा. पायीवारी निमित्त ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८ वाजता हरी किर्तनाचे आयोजन केले आहे. पायीवारी व हरिकिर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# सातत्य, परिश्रम आणि आत्मविश्वास हीच यशाची गुरूकिल्ली– खा. अनुप धोत्रे

## श्री समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे वार्षिक स्नेहसंमेलन

प्रतिनिधी २७ डिसेंबर






**अकोला:** प्रत्येक विद्यार्थ्याने आयुष्यामध्ये मोठी स्वप्न पाहिली पाहिजेत आणि त्या स्वप्नांच्या दिशेने मार्गक्रमण करीत यशाचे सर्वोच्च शिखर गाठले पाहिजे. त्यासाठी सातत्य, अथक परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वास यांची सांगड आवश्यक असल्याचे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

श्री समर्थ पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेज, नर्सिंग कॉलेज, बी.ए.एम.एस कॉलेजच्या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना काढले. श्री समर्थ द ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन, अकोला या संस्थेच्या अनुषंगाने 'आरंभ', 'उम्मीद' आणि 'विरासत' या वार्षिक स्नेहसंमेलनाचा नुकताच उत्साहात समारोप झाला. यामध्ये समर्थ पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेज शाखा, रणपिसे नगर, रिधोरा रोड, गोरक्षण रोड, समर्थ नर्सिंग कॉलेज आणि बी.ए.एम.एस. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

तीन दिवसीय वार्षिकोत्सव-२०२५ मध्ये संस्थेचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांच्या मातोश्री श्रीमती सुमनताई बाठे यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांच्या अध्यक्षतेखाली अकोला जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार अनुप धोत्रे, अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी रतनसिंह पवार तसेच संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी प्रा.जयश्री बाठे, राजेश बाठे, प्रा.किशोर कोरपे, प्रा.किशोर रत्नपारखी, प्रा.योगेश जोशी, श्रीकांत बाठे, समृद्धी बाठे या सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत स्नेहसंमेलन पार पडले.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी श्री समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनच्या वेगवेगळ्या उपक्रमांच्याबाबत गौरवोद्गार काढले आणि संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. आरंभ, उम्मिद आणि विरासत या थीमच्या माध्यमातून भव्य स्वरूपात नृत्य, नाट्य, अभिनय यांचा सुरेख संगम स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने अकोलेकरांना अनुभवता आला. यावेळी संस्थेच्या माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी अप्रतिम कलाविष्कार सादर केले. वर्षभरात वेगवेगळ्या क्षेत्रात शैक्षणिक प्रगती केलेल्या तसेच सांस्कृतिक, क्रिडा क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कार्य केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. संगीत रजनी आणि बहारदार नृत्याविष्कार यावेळी उपस्थित रसिकांचे खास आकर्षण होते. सोबत बीएस्सी नर्सिंगच्या तसेच जी.एन.एम. आणि बी.ए.एम.एस. च्या विद्यार्थ्यांचा लँम्प लाईटिंग व शपथविधी सोहळा विशेष आकर्षण ठरला. या स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी अप्रतिम नृत्य, अभिनयाचे सादरिकरण करुन पालक व उपस्थितांची मने जिंकली. वर्षभरात वेगवेगळ्या क्षेत्रात आणि शैक्षणिक प्रगती केलेल्या हरहुन्नरी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे आणि पदाधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले. अकरा एक्कर भव्य परिसरामध्ये दिव्यांच्या रोषणाईत साजऱ्या झालेल्या या स्नेहसंमेलनामध्ये प्रत्येक गोष्ट डोळ्याचे पारणे फेडणारी ठरली, असे गौरवोद्गार उपस्थित पालक व श्रोत्यांनी काढले. प्रत्येक सत्राचे बहारदार सूत्रसंचालन नर्सरी ते दहावीच्या तसेच नर्सिंग आणि बीएएमएस कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिमरित्या करून वेगळीच छाप पाडली. संगीत रजनीमध्ये विद्यार्थी गायक कलाकारांनी गायिलेली सुमधूर गाणी तसेच विद्यार्थ्यांनी वाजविलेली अप्रतिम विविध वाद्ये विद्यार्थी पालकांचे मन जिंकून गेले. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलागुणांचा आविष्कार एवढ्या मोठ्या आणि भव्य प्रमाणात साजरा व्हावा, ही संस्थेची असलेली मनिषा मला मोहित करून गेली. आज खरोखर मी एवढा छान सोहळा बघून भारावून गेलो वआहे, असे गौरवोद्गार अकोला जिल्ह्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंह पवार यांनी काढले. श्री समर्थ एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांनी श्री समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन ही संस्था विद्यार्थी आणि पालकांच्या प्रेमावर उभी असल्याचे प्रांजळ मत यावेळी मांडले. वार्षिक स्नेहसंमेलनाला संस्थेच्या संचालिका प्रा.जयश्री बाठे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेच्या प्राचार्य उषा वानखडे, प्राचार्य सुवर्णा गुप्ता, प्राचार्य मुग्धा कळमकर, उपप्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार, बी.ए.एम.एस. कॉलेजचे प्राचार्य डॉ.आशिष चांडक, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब भुतकर, तिन्ही शाळेच्या आणि शिक्षकवृंद आणि प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# तयारी नरनाळा महोत्सवाची; दरपत्रके मागवली

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अकोला:** जिल्हा प्रशासनातर्फे अकोट वन्यजीव विभागाच्या सहकार्याने दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान नरनाळा निसर्गपर्यटन व सांस्कृतिक महोत्सवाची पूर्वतयारी सुरू असून, विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी सेवा पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात आली आहेत.

त्यानुसार विविध कार्यक्रमांसाठी ३ दिवस सलग स्टेज, ४० बाय ६० फूट (एलईडी स्टेज), ५०० व्यक्तींसाठी बसण्याची व्यवस्था असलेला मंडप, अनुषंगिक साहित्यासह प्रदर्शनासाठी दालने, प्रकाशयोजना, ध्वनीक्षेपण यंत्रणा, जनरेटर, निवासी तंबू (लहान व मोठे), संपूर्ण महोत्सवादरम्यान स्वच्छतेची व्यवस्था करणे आदी कामे होणे आवश्यक आहे.

इच्छूक पुरवठादारांनी दि. ६ जानेवारी २०२६ पर्यंत पाकिटबंद दरपत्रक उपविभागीय अधिकारी कार्यालय, अकोट येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे. हे दरपत्रक दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, अकोट येथे उघडण्यात येतील.


# विभागातील निवासी शाळांच्या विद्यार्थ्यांचे अकोल्यात स्नेहसंमेलन

**अकोला:** सामाजिक न्याय विभागातर्फे शासकीय निवासी शाळांच्या विद्यार्थ्यांचे विभागीय स्नेहसंमेलन, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी अकोला येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे होणार आहे. अमरावती विभागातून पाचही जिल्ह्यातून सुमारे ८५० विद्यार्थी त्यात सहभागी होतील.

समाजकल्याण विभागाच्या नियंत्रणातील पाचही जिल्ह्यांतील शासकीय निवासी शाळा सहभागी होणार आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच क्रीडा स्पर्धांमध्ये सांघिक व वैयक्तिक मैदानी खेळांचा समावेश राहील. त्याबाबत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून नियोजन व पूर्वतयारी करण्यात आली आहे.

# कुटासा ते रोहनखेड रोडवरून अवैध वाळू वाहतूकीला उधान

## महसुल प्रशासन व पोलीस प्रशासनाचे कारवाई कडे दुर्लक्ष का?



प्रतिनिधी २७ डिसेंबर

**कुटासा:** कुटासा ते रोहनखेड रोडवरून अवैध वाळु वाहुकीला उधान आल्याचे चित्र दिसुन येत आहे गेल्या काही दिवसापासून रॉयलटीच्या नावावर दिवसा ढवळ्या विना नंबरच्या ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये खुल्लेआम अवैध वाळु वाहतुक केली जात असुन या कडे महसुल व पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने या अवैध वाळु वाहतुक करणाऱ्याचे चांगलेच चांगभले होताना दिसुन येत आहे. तर ग्रामीण भागात कुठलीही कारवाई होत नसल्याने अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांना चांगलाच उत आला असुन रोज मोठ्या प्रमाणात अवैध रेती वाहतुक व विक्री केली जात आहे. अकोट तालुक्यातील ग्रामीण भागात सर्रास वाहतुक व विक्री होत असुन परीसरातील गावात भर रस्यांवर अवैध रेतीचे मोठे मोठे ढिग लागल्याचे दिसुन येत आहेत. या कडे अकोट तहसिलदार यांचे दुर्लक्ष होत असुन या अवैध रेती वाहतुक व विक्री करणाऱ्यांवर दहीहांडा पोलीसांनी व महसुल प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी परीसरात जोर धरू लागली आहे.

# पिंपळडोळी येथे क्रिकेटचे सामने संपन्न

प्रतिनिधी २७ डिसेंबर



**आलेगाव :** येथून जवळच असलेल्या पिंपळडोळी येथील रॉयल क्रिकेट क्लब तर्फे हापपीच क्रिकेटचे दणदणीत सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. या खेळामध्ये विविध गावातील क्रिकेट खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. प्रथम बक्षीस पारखेड येथील चमूने तर द्वितीय बक्षीस कोळगाव चमूने तर तृतीय ग्राम पिंपळडोळी चमूने, चतुर्थ बक्षीस चायगाव चमूने तर पाचवे बक्षीस ग्राम आवार चमूने पटकाविले.

तसेच प्रथम बक्षीस इमरान खान मुमताज खान यांच्या वतीने रोख रक्कम २१००१रुपये जाहीर करण्यात आले होते. द्वितीय बक्षीस वंचित बहुजन आघाडीचे सामाजिक कार्यकर्ते निलेश करवते यांचे तर्फे १०००१रुपये तर तृतीय बक्षीस जिल्हा परिषद शाळा व हायस्कूल तर्फे५००१रुपये तर चतुर्थ बक्षीस ग्राम पंचायत सदस्य अक्षय देशमुख यांचे तर्फे ३००० रुपये तर पाचवे बक्षीस रवी ताजने यांचे तर्फे१००० रुपये आणि लगातार तीन सिक्स करीता प्रकाश बुंदे तर्फे ५०० रुपये आणि लगातार तीन विकेट करीता युनिक मेडिकल तर्फे ५०० रुपये बक्षीस देण्यात आले. हाप पीच मैदानाचे उद्घाटन पातूर पंचाय समिती माजी उपसभापती इमरानखान मुमताजखान पिंपळडोळी ग्राम पंचायत सरपंच दिलीप ताजने, निलेश करवते, शिक्षक ठाकरे, गायकवाड, आणि अक्षय देशमुख, गजानन डाखोरे, इरफान भाई, अमजद खान, आसिफ भाई, गुलाब टेलर, देवकते, माजी सरपंच राहुल ताजने, राजिक भाई, बबलू भाई आदींच्या हस्ते करण्यात आले. शेख राजीक, दिलीप ताजने, प्रवीण व्यवहारे, बबलू भाई, अक्षय देशमुख, हिंमत ताजने आदींनी सामने यशस्वी रित्या पार पडावे म्हणून विशेष प्रयत्न केले. तसेच पंच म्हणून मोहसीन शेख यांनी काम पाहिले. क्रिकेट सामन्यांचे आयोजन रॉयल क्रिकेट क्लब आणि गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते.

# सकल अग्रवाल समाजाच्या राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्षपदी रमाकांत खेतान यांची निवड

प्रतिनिधी २७ डिसेंबर




**अकोला :** सकल अग्रवाल समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक उत्थानासाठी देशभरात सेवा करणाऱ्या अखिल भारतीय अग्रवाल संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची निवडणूक हरियाणाच्या पंचकुलात येथे झाली. राष्ट्रीय कार्यकारिणीत अकोला महानगरातील वरिष्ठ उद्योजक रमाकांत खेतान यांची राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवड करण्यात आली.

संघटनेच्या राष्ट्रीय चेअरमनपद नवी दिल्लीचे प्रदीप मित्तल, राष्ट्रीय अध्यक्षपदी इंदूरचे कुलभूषण मित्तल, राष्ट्रीय महामंत्रीपदी सूरतचे राजेश भारुका, वरिष्ठ राष्ट्रीय उपाध्यक्ष अकोल्याचे रमाकांत खेतान, राष्ट्रीय संघटनमंत्री धुळ्याचे विनोद अग्रवाल, राष्ट्रीय मंत्रीपदी बोदवडचे गोपाल अग्रवाल, राष्ट्रीय संघटन मंत्रीपदी नाशिकचे किरण अग्रवाल यांच्यासह इतर पदाधिकारी कामकाज पाहणार आहेत. नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष कुलभूषण मित्तल व नूतन कार्यकारिणीचा शपथग्रहण सोहळा संघटनेचे चेअरमन प्रदीप मित्तल व महाराष्ट्र राज्य अग्रवाल संमेलनाचे प्रांतिय अध्यक्ष विजयकुमार चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. रमाकांत खेतान हे जनता बँकेचे अध्यक्ष, लॉयन्स क्लबचे माजी गव्हर्नर असून व्यापार, उद्योग, सामाजिक व शैक्षणिक संस्थांमध्ये विविध पदावर सेवारत आहेत.

# नववर्षातील आकाश नवलाई २०२६

प्रतिनिधी २७ डिसेंबर



**अकोला:** नववर्षाच्या स्वागतासाठी आकाशातही विविध खगोलीय घटनांचा आनंद देण्यासाठी व ग्रह ताऱ्यांशी मैत्री जोडण्यासाठी आकाश प्रेमींनी सज्ज होण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे.

सद्यस्थितीत संध्याकाळी पूर्व क्षितिजावर आकाशातील नवलाई दिसून येत असून सोबत सूर्यमालेतील सर्वात मोठा असलेला गुरू ग्रह रात्रभर असल्याने आपल्या आनंदात विशेष भर पडेल. पूर्वेच्या अपूर्व नजाऱ्यात बहू परिचित मृगनक्षत्र, जरा डाव्या बाजूस मिथुन राशी व अधिक प्रकाशित दिसणारा गुरु ग्रह. जरावर वृषभ राशीतील रोहिणी आणि डोक्यावर मेष राशीतील अश्विनी पाहता येईल.

वर्षारंभीच ३ जानेवारीला चंद्र आणि सूर्य पृथ्वीच्या जवळ आल्याने चंद्र अधिक प्रकाशित असल्याने सुपर मून असेल. असाच नजारा २४ नोव्हेंबर व २४ डिसेंबर रोजी बघता येईल. तसेच सूर्य सुध्दा येत्या ३ जानेवारीला पृथ्वी जवळ येईल परंतु सध्या सूर्य दक्षिण गोलार्धात झुकलेला असल्याने तिकडे कडक उन्हाळा तर उत्तर गोलार्धात हिवाळा आहे. यावर्षी आकाशात अनेक घटनांची रेलचेल असुन त्यात ग्रहणे, उल्का वर्षाव, ग्रहांची युती-प्रतियुती, इंटरनॅशनल स्पेस स्टेशन, स्टार लिंक्स, ग्रह दर्शन, उदयास्त, सुपर मून, अचानक दाखल होणारे धुमकेतू अशा अनेक आकर्षक घडामोडी बघता येतील. नववर्षात सूर्य, चंद्र व प्रत्येकी दोन अशी चार ग्रहणे असुन आपल्या वाट्याला मात्र फक्त एक ३ मार्चचे चंद्रग्रहण असेल. पृथ्वी कक्षा आणि धुमकेतू वा लघुग्रह यांच्यातील वस्तूकण जेंव्हा पृथ्वी गुरुत्वाकर्षणामुळे खेचल्या गेल्याने उल्का वर्षाव अनुभवता येतो. वर्षारंभी ३ व ४ जानेवारी, २३ एप्रिल, ५ मे, २८ जुलै, १३ ऑगष्ट, २१ ऑक्टोबर, ६ व १२ नोव्हेंबर आणि १४ व २३ डिसेंबर या दिवशी तारे तूटतांना दिसतील. २० मार्च व २३ सप्टेंबर या विषुवदिनी वसंत व शरद संपात व २१ जून आणि २२ डिसेंबर अयनदिन असतील. चांद्र आणि सौर महिन्याचा मेळ साधणारा अधिक ज्येष्ठमास १७ मे ते १५ जून पर्यंत असेल. सध्या पूर्व आकाशातील गुरु ग्रह एक जुन रोजी कर्क राशीत व नंतर १७ जूलैला अस्त आणि मग १० ऑगस्टला पूर्वोदयानंतर ३१ ऑक्टोबरला सिंह राशीत प्रवेश. सर्वात तेजस्वी शूक्र ग्रहाचा अस्त असून १ फेब्रुवारीला पश्चिमेस १९ ऑक्टोबर पर्यंत व नंतर दिवाळी आधी दर्शनार्थ सज्ज होईल. सूर्याच्या जवळ असलेला बुध ग्रह कधी सूर्योदयापूर्वी पूर्वेस किंवा सूर्यास्तानंतर पश्चिम आकाशात पाहता येईल. लालसर रंगांचा मंगळ ग्रह या वर्षात अधिक वेळ सूर्य सान्निध्यात राहिल्याने कमी दर्शन देईल.

# राज्यस्तरीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेत ४०० खेळाडूंचा सहभाग



प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अकोला:** क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत अकोला येथील जसनागरा पब्लिक स्कूल येथे राज्यस्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धा नुकतीच झाली. त्यात राज्यातील ४०० खेळाडू सहभागी होते.

राज्य बेसबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष इंद्रजीत नितनवार, महाराष्ट्र राज्य बेसबॉल असोसिएशनचे तांत्रिक अधिकारी अशोक सरोदे, अकोला जिल्हा बेसबॉल संघटनेचे सचिव नारायण बत्तुले, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट, निवड समिती सदस्य राज्य क्रीडा मार्गदर्शक रेवन्ना शेलार, प्रा संतोष खेंडे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीसवितरण झाले. मुलांच्या विभागात पुणे,

कोल्हापूर, अमरावती, नाशिक यांनी अनुक्रमे पहिली चार बक्षीसे पटकावली. मुलींच्या विभागात पुणे, मुंबई, नाशिक व नागपूर यांनी पहिली चार बक्षीसे मिळवली.

पंच म्हणून आकाश साबणे (परभणी), विक्की सैरिसे (अमरावती), अकलिम शहा (अमरावती), तौफिक शहा (अमरावती), अभिजीत स्वर्गे (अमरावती), आरती भगत (कोल्हापूर), सायमा बाजवान (परभणी), रजत हिरोडे (अकोला), जहागीर शेख (लातूर) यांनी केले. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंच्या निवासाची व क्रीडांगणाची व्यवस्था जसनागरा पब्लिक स्कूलमध्ये करण्यात आली. स्पर्धेचे नियोजन जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सतीशचंद्र भट्ट, क्रीडा मार्गदर्शक श्रीमती डॉ. नलिनी जाधव, डॉ. अभिजीत फिरके, राजेश गावंडे (जिल्हा संघटक) श्रीमती मनीषा ठाकरे क्री. अ. निशांत वानखडे, गजानन चारसे यांनी परिश्रम घेतले.

# मतदार जनजागृती अंतर्गत मनपा शालेय विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा



प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अकोला:** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने अकोला महानगरपालिकेच्या मनपा उर्दू मुलांची शाळा क्रं. ६ आकोट फैल येथे वर्ग ७ वा ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीपर विविध आकर्षक चित्रकला काढली असून ज्यामध्ये मतदान - लोकशाहीची ओळख, देशाचा महा उत्सव, मतदान करा - लोकशाही बळकट करा, मतदान आपका अधिकार है, मतदान केंद्र, भारत माता आदी जनजागृतीपर विद्यार्थ्यांव्दारे या चित्रकला स्पर्धाच्या माध्यमातून फलके तयार करण्यात आले आहे. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्रथम, व्दितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कारपर प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

यावेळी मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी, मतदार जनजागृती हरिश्चंद्र इटकर, शाळेचे मुख्याद्यापक मो.अ.अजीज, शिक्षिका/शिक्षिका सौ.फरूख कैसर, शुजाऊद्दीन, कुबरा परवीन, सौ.नासेहा तबस्सुम, संजय खराटे, यांचेसह शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिकांची उपस्थिती होती.

# जन्मदात्या पित्यानेच केला १२ वर्षीय मुलीचा छळ

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**तेल्हारा :** तालुक्यातून माणुसकीला काळीमा फासणारी संतापजनक आणि हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. ज्या जन्मदात्या पित्याच्या सावलीत मुलगी सुरक्षित असायला हवी होती, त्याच पित्याने आपल्या १२ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचं बालपण उद्ध्वस्त केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे इतक्यावरच हे अमानुष कृत्य थांबले नाही. पीडितेने धीर एकवटून सत्य सांगितल्यानंतर काका आणि शेजारी राहणाऱ्या वृद्ध व्यक्तीनेही तिच्यावर अत्याचार केल्याचं उघड झालं आहे. अडसूळ गावात घडलेल्या या घटनेने तालुक्यासह अकोला जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. गावातील शाळेत 'चाईल्ड लाईन' व प्रशासनाच्या वतीने आयोजित समुपदेशन सत्रादरम्यान पीडित मुलीने शाळेचे मुख्याध्यापक गणेश ठाकरे यांच्यासमोर आपली व्यथा मांडली. संरक्षण देणाऱ्यांकडूनच तिला धोका असल्याचं वास्तव समोर आलं. मुख्याध्यापक आणि चाईल्ड लाईनच्या महिला अधिकाऱ्यांनी तातडीने तेल्हारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, आणि हे भयंकर प्रकरण उघडकीस आले.

या प्रकरणी अपराध क्रमांक ३८२/२५ अंतर्गत तसेच पॉक्सो कायदा कलम ४, ६, ८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पीडितेचे वडील आणि शेजारी वृद्ध व्यक्तीला अटक केली आहे. काका २० दिवसांपासून फरार असून पुण्यात लपल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. फरार आरोपीच्या अटकेसाठी विशेष पथक तैनात करण्यात आलं आहे. या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक निलेश ठाकरे करत आहेत. या घटनेनंतर तेल्हारा तालुक्यात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. 'मुलीनं दाखवलेलं धैर्य कौतुकास्पद आहे, आता तिला न्याय मिळालाच पाहिजे,' अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. शाळा प्रशासन, सामाजिक संस्था व महिला संघटना पीडित मुलीच्या पुनर्वसनासाठी पुढे आल्या आहेत. पीडित मुलीचं वैद्यकीय परीक्षण व मानसशास्त्रीय समुपदेशन सुरू असून पोक्सो कायद्यांतर्गत आरोपींना कडक शिक्षा होण्याची दाट शक्यता आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५

## चालगणी गावाजवळ अनियंत्रित ट्रॅक्टर पुलावरून कोसळला

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**उमरखेड** : तालुक्यात मोठ्या प्रमाणात ऊसतोड व वाहतूक सध्या वेगाने सुरू आहे. अशातच विडुळ–देवसरी रस्त्यावरील चालगणी गावाजवळ असलेल्या नाल्याच्या पुलावरून एक अनियंत्रित ट्रॅक्टर कोसळल्याची घटना शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही. मात्र अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी मोठ्या प्रमाणात बघ्यांची गर्दी जमली होती. गर्दीमुळे काही काळ विडुळ–देवसरी रस्त्यावरील वाहतूक खोळंबल्याचे दिसून आले.



# शिवसेनेच्या दोन गटांतील अंतर्गत संघर्ष उफाळला

### सत्काराच्या कार्यक्रमात केला राडा, ते शिवसैनिक कसले गद्दार !

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषद निवडणुकीनंतर शिवसेना (उबाठा) गटातील अंतर्गत मतभेद उघडपणे समोर आले असून, शनिवारी (दि. २७ डिसेंबर) खासदार संजय देशमुख यांच्या सत्कारासाठी आयोजित कार्यक्रमात दोन गटांतील संघर्ष उफाळून आला. या घटनेमुळे शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.







यवतमाळ नगर परिषद निवडणुकीपूर्वी शिवसेना (उबाठा) व काँग्रेस यांच्यात युतीची घोषणा करण्यात आली होती. मात्र ऐनवेळी ही युती तुटल्याने दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले. शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आलेले संतोष ढवळे यांनी काँग्रेसशी हातमिळवणी करत काही उमेदवार उभे केले होते. मात्र निवडणुकीत शिवसेना (उबाठा) तसेच ढवळे समर्थित उमेदवारांचा पराभव झाला.

या निकालानंतर शिवसेना (उबाठा) गटात नाराजी वाढली होती. विशेष म्हणजे, खासदार असतानाही यवतमाळ नगरपालिकेत पक्षाचा एकही नगरसेवक निवडून न आल्याने कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली. या पार्श्वभूमीवर संतोष ढवळे यांनी खासदार संजय देशमुख तसेच शिवसेनेचे काही पदाधिकारी यांच्यावर जाहीर टीका केली होती.

या पार्श्वभूमीवर शनिवारी येथील एका मंगल कार्यालयात खासदार संजय देशमुख यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र या कार्यक्रमस्थळी शिवसेना नेते राजेंद्र गायकवाड यांच्यासह काही पदाधिकारी व कार्यकर्ते भगवे झेंडे हातात घेऊन दाखल झाले. त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत संतोष ढवळे यांच्यावर आरोप केले आणि त्यांच्यावरील टीकेचे खंडन केले.

राजेंद्र गायकवाड यांनी संतोष ढवळे यांची पक्षातून हकालपट्टी झाल्याचे स्पष्ट करत, "पक्षाशी निष्ठा नसलेल्यांनी शिवसेनेचे नाव घेऊ नये," असा आरोप केला. तसेच ढवळे यांनी यापूर्वी विविध पक्षांसाठी काम केल्याचा दावा करत, सध्याच्या निवडणुकीत काँग्रेसचे नेते शिवाजीराव मोघे व आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्यासाठी ते कार्यरत होते, असा आरोपही त्यांनी केला.

कार्यक्रमस्थळी खासदार संजय देशमुख यांचे लावलेले काही बॅनर शिवसैनिकांनी फाडल्याची घटना घडली. काही बॅनर काढून नेण्यात आल्याने वातावरण अधिक तणावपूर्ण बनले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेता अवधूतवाडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांची समजूत काढून परिस्थिती नियंत्रणात आणली.

या घटनेमुळे शिवसेना (उबाठा) गटातील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले असून, नगर परिषद निवडणुकीनंतरचा असंतोष अजूनही कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांमधील हा संघर्ष आगामी स्थानिक राजकारणावर काय परिणाम करतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हार्डवेअर दुकानातील ५.४२ लाखांची चोरी उघडकीस; ठेकेदार आरोपी अटकेत

प्रतिनिधी २७ डिसेंबर



**यवतमाळ** : शहरातील आर्णी रोडवरील राणा प्रताप गेटजवळ असलेल्या भारमल हार्डवेअर अँड सिमेंट दुकानातून झालेल्या ५ लाख ४२ हजार रुपयांच्या चोरीचा गुन्हा अवधूतवाडी पोलिसांनी तत्परतेने उघडकीस आणत आरोपीस अटक केली आहे. आरोपीकडून चोरीस गेलेली संपूर्ण रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी साबीर हुसेन कमरुद्दीन भारमल (रा. यवतमाळ) यांनी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते ९.३० वाजताच्या सुमारास दुकान उघडत असताना काउंटरवर ठेवलेली ५,४२,२०० रुपयांची रोकड असलेली बॅग अज्ञात व्यक्तीने चोरून नेली होती. यावरून अवधूतवाडी पोलीस ठाण्यात अप.क्र. १६५५/२०२५ अन्वये कलम ३०३(३) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखा व अवधूतवाडी पोलिसांचे संयुक्त तपास पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने ही चोरी दिनेश भाऊराव मंडाले (वय ३२, व्यवसाय ठेकेदार, रा. तळेगाव भारी, ता. जि. यवतमाळ) याने केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीस गेलेली ५,४२,२०० रुपयांची रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व मोबाईल असा एकूण ६,३२,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस निरीक्षक सतीश चौरे (स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) व पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे (पोलीस ठाणे अवधूतवाडी) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपास पथकात सपोनि श्रीकांत जिंदमवार, पोउपनि सूरज जगताप, पोउपनि आकाश माळगे, सहायक फौजदार गजानन वाटमोडे, सुरेश मेश्राम, पोहकों बलराम शुक्ला, विठ्ठल चव्हाण, पोना रूपेश ढोबळे, योगेश चोपडे, मो. भगतवाले, नितीन खवडे, सचिन राठोड तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि गजानन राजमल्लू व त्यांचे पथक सहभागी होते. पुढील तपास पोउपनि आकाश माळगे करीत असून न्यायालयाने आरोपीस दिनांक २७ डिसेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

## उमरखेड आयटीआयमध्ये 'वीर बाल दिवस'

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**उमरखेड** : येथील हुतात्मा मधुकर चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), उमरखेड येथे २६ डिसेंबर रोजी 'वीर बाल दिवस' उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. शीख धर्माचे दहावे गुरू श्री गुरु गोविंद सिंग जी यांचे सुपुत्र साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांच्या सर्वोच्च बलिदानाची गाथा युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे प्राचार्य डी. पी. पवार व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. यावेळी उपस्थितांनी साहिबजाद्यांच्या अदम्य शौर्याला मानवंदना अर्पण केली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डी. पी. पवार म्हणाले, "अन्यायासमोर न झुकता मृत्यूला कवटाळणाऱ्या साहिबजाद्यांचे धैर्य जगाच्या इतिहासात अद्वितीय आहे. त्यांचा स्वाभिमान व साहसाचा वारसा जतन करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल." यावेळी मार्गदर्शन करताना शिवानंद निंबोळकर यांनी सांगितले, "ज्या देशाचा इतिहास अशा वीर बालकांच्या बलिदानाने उजळून निघाला आहे, त्या देशाचे नागरिक असल्याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन देशहितासाठी कार्य करूया." कार्यक्रमात प्रशिक्षणार्थ्यांनी साहिबजाद्यांच्या शौर्यावर आधारित प्रभावी भाषणे सादर केली. तसेच संस्थेतील 'वीर बालक' म्हणून कु. मयुरी शिंदे (इलेक्ट्रिशियन ट्रेड), कु. ऋतुजा कदम आणि कु. सपना घुगरे (ब्युटी पार्लर व्यवसाय) यांचा प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

## 'विनोबा अँपमध्ये उत्कृष्ट कामगिरी; शिक्षकांचा सन्मान



प्रतिनिधी २७ डिसेंबर

**पुसद** : जिल्हा परिषद यवतमाळ व ओपन लिंक फाउंडेशन यांच्या सामंजस्य करारातून राबविण्यात येणाऱ्या आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम (विनोबा ॲप) अंतर्गत उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात 'पोस्ट ऑफ द मंथ पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. नोव्हेंबर महिन्यांतील जिल्हास्तरीय पोस्ट ऑफ द मंथ विजेते पंचायत समिती पुसद अंतर्गत आम्रपाली संभाजीराव गडदणे, वसुंधरा एकनाथ कऱ्हाळे यांचा 26 डिसेंबरला गौरव करण्यात आला. पोस्ट ऑफ द मंथ' पुरस्कार हा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत नवोन्मेषी शिक्षण पद्धतींचा अवलंब करणाऱ्या शिक्षकांना ओळखण्यासाठी आणि त्यांना पुरस्कृत करण्यासाठीचा एक उपक्रम आहे. एफएलएन, स्पोकन इंग्लिश आणि महावचन यांसारख्या कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या कौशल्यांमध्ये वाढ करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पण भावनेचाही या कार्यक्रमात गौरव करण्यात आला.

हा सन्मान गटशिक्षणाधिकारी धीरज आडे, विस्तार अधिकारी (शिक्षण) वानखेडे वाघमारे आणि जिल्हा प्रकल्प अधिकारी राम हटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी राम रोगे आदी केंद्रप्रमुख, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

## नागापूरमध्ये 'संकल्प ग्राम विकास अभियान'

प्रतिनिधी २७ डिसेंबर



**उमरखेड** : राष्ट्रपिता महात्मा गांधी, कर्मयोगी संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन नागापूर येथे २०११ पासून राबविण्यात येत असलेल्या संकल्प ग्राम विकास अभियानाला यंदा एक तप पूर्ण झाले. २० ते २६ डिसेंबर या कालावधीत विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व सांस्कृतिक उपक्रमांनी ग्रामविकास सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. २० डिसेंबर रोजी संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले.

महिला, पुरुष, युवक व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. २१ डिसेंबर रोजी तरुणांसाठी कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. याच दिवशी मुळावा आरोग्य केंद्रातर्फे ५५ नागरिकांची आरोग्य तपासणी झाली. तसेच तालुकास्तरीय शिक्षकांचा कलाविष्कार कार्यक्रमात पोवाडे, अभंग, गीतगायन, रांगोळी व विनोदी सादरीकरण झाले. या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी प्रमोद सूर्यवंशी, गटशिक्षणाधिकारी विजय बेटेवाड यांच्यासह शिक्षकवर्ग उपस्थित होता.

२२ डिसेंबर रोजी पोफाळी पोलीस स्टेशन हद्दीतील गावांतील पोलीस पाटील, सरपंच व तंटामुक्त समिती अध्यक्षांसाठी मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. सहायक पोलीस अधीक्षक हर्षवर्धन बी. जे. (आयपीएस) यांनी कायदा व सुव्यवस्था राखत स्पष्ट आणि ठाम भूमिका घेण्याचे आवाहन केले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड व ठाणेदार निलेश शेबंडे उपस्थित होते.

२३ डिसेंबर रोजी मुळावा व पोफाळी महिला प्रभाग संघाचा मेळावा झाला.

'ग्रामविकासात उमेद महिलांचे योगदान' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी संत गाडगेबाबा मोक्षधाम येथे ८० लाख रुपये खर्चून झालेल्या कामांची पाहणी केली. तसेच मुख्यमंत्री स्वच्छ शाळा-सुंदर शाळा जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त शाळेस भेट देण्यात आली. बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक स्वावलंबन साधावे, असे आवाहन करण्यात आले.

२४ डिसेंबर रोजी १०७ जनावरांची आरोग्य तपासणी करण्यात आली. पळशी पशुवैद्यकीय दवाखान्यांतर्गत ११ गावांतील दुधाळ गायी व म्हशींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. ३० हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली होती. यावेळी उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. मंगेश काळे व डॉ. क्रांती काटोले यांनी दुग्ध व्यवसायाबाबत मार्गदर्शन केले. २६ डिसेंबर रोजी समारोपीय कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल सत्कार करण्यात आले. शैक्षणिक कार्यासाठी देणगी, शिक्षक व क्रीडापटूंचा गौरव, स्वच्छतेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उमरखेड आगाराचा सत्कार तसेच सामाजिक सेवेसाठी स्थानिक पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भीमराव पाटील चंद्रवंशी होते. सूत्रसंचालन सीमा चंद्रवंशी व पद्मावती लोमटे यांनी केले, तर आभार अविनाश केंद्रे यांनी मानले.

चितांगराव कदम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या अभियानाला ग्रामस्थांचे भक्कम सहकार्य लाभले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातही नागापूर ग्रामपंचायत सहभागी झाली असून सन्मान मिळविण्यासाठी गावकरी मार्गदर्शक तत्त्वांनुसार कार्यरत आहेत.

## जीर्ण शाळेकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**महागाव** : ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या रखडलेल्या समस्या पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. महागाव तालुक्यातील डोंगरगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गखोल्या गेल्या अनेक वर्षांपासून जीर्ण झाल्या असून, याकडे शिक्षण विभागाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. यामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याची तक्रार शालेय व्यवस्थापन समितीने केली आहे.

शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत वर्ग असून, पहिली ते चौथीच्या वर्गखोल्या धोकादायक झाल्या आहेत. यासंदर्भात शालेय व्यवस्थापन समितीने ३१ जुलै २०२४ रोजी जिल्हाधिकारी यवतमाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ तसेच गट विकास अधिकारी पंचायत समिती महागाव यांच्याकडे तक्रार सादर केली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने ६ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जीर्ण इमारतीचे निरीक्षण करून नवे बांधकाम करण्याबाबत पत्र दिले. मात्र, शिक्षण विभागाने याची दखल घेतली नाही.

यापूर्वी १३ नोव्हेंबर २०१८ पासून निर्लेखनाचा प्रस्ताव प्रलंबित आहे. अखेर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी २४ डिसेंबर २०२५ रोजी गट विकास अधिकाऱ्यांना लेखी तक्रार सादर करून तात्काळ निर्लेखन करून नवे बांधकाम करण्याची मागणी केली. अन्यथा येणाऱ्या २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी गट विकास अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त जागा, अपुऱ्या सुविधा आणि जीर्ण इमारतींच्या समस्यांमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा कल शहराकडे वळत असल्याचे चित्र आहे.

## 'विकसित भारत–जी रामजी'तून ग्रामविकासाला गती

### अंबोडा ग्रामसभेत रोजगार हक्कांबाबत जनजागृती; 'एक दिवस मजुरांसोबत' उपक्रम

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**आर्णी** : 'विकसित भारत – जी रामजी' अभियान हे केवळ रोजगारनिर्मितीपुरते मर्यादित नसून विकसित ग्रामपंचायत संकल्पनेशी सुसंगत असा सर्वांगीण ग्रामविकासाचा प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन पंचायत समिती आर्णीचे गटविकास अधिकारी रमेश आर. खरोडे यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत अंबोडा (ता. आर्णी, जि. यवतमाळ) येथे आयोजित ग्रामसभेत ते बोलत होते.

ग्रामसभा ही लोकशाहीची खरी ताकद असून स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, डिजिटल सेवा, हरित ऊर्जा, वृक्षलागवड तसेच महिला व युवक सक्षमीकरण या घटकांचा समावेश असलेल्या 'जी रामजी' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी ग्रामसभेच्या माध्यमातूनच शक्य असल्याचे खरोडे यांनी स्पष्ट केले. प्रत्येक गावाचा विकास साधला, तरच विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात येईल, असेही त्यांनी सांगितले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायतीच्या सरपंचा सौ. वर्षाताई बा. आडे होत्या. विस्तार अधिकारी (पंचायत) गोविंद इंगोले, विस्तार अधिकारी (कृषी) सुरेश चांगोले, नवनिर्माण संस्थेचे दीपक राठोड, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर, उपसरपंच सौ. चंचलाताई पावडे, मुख्याध्यापक अंकुश मोरे, विकासगंगा समाजसेवी संस्था घाटंजी व रिलायन्स फाउंडेशनचे वैभव गायकी आदी उपस्थित होते.

दरम्यान, ग्रामीण मजुरांमध्ये रोजगार हक्कांबाबत जागृती निर्माण करण्यासाठी 'एक दिवस मजुरांसोबत-रोजगार जागृती दिन' हा उपक्रम ग्रामपंचायत अंबोडा, पंचायत समिती आर्णी व नवनिर्माण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. यावेळी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) संदर्भात मजुरांशी थेट संवाद साधण्यात आला. जॉबकार्डचे महत्त्व, कामाची मागणी करण्याची प्रक्रिया, मजुरीचे दर, ऑनलाईन नोंदी व तक्रार निवारण याबाबत सविस्तर माहिती देताना, "काम मागणे ही भीक नसून तो कायदेशीर हक्क आहे," हा ठळक संदेश देण्यात आला. मनरेगा ही ग्रामीण गरीबांसाठी जीवनाधार ठरत असून किमान १२५ दिवसांचा रोजगार, वेळेत मजुरी, स्थलांतराला आळा व गावातच विकासकामे निर्माण करणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक राठोड यांनी केले. सूत्रसंचालन सलमान पठाण तर आभार प्रदर्शन राजू मतपलवाड यांनी केले. मोठ्या संख्येने मजूर वर्ग या कार्यक्रमास उपस्थित होता.

#### गावाची अर्थव्यवस्था मजबूत होणार

'विकसित भारत – जी रामजी' अभियानामुळे गावातच रोजगाराच्या संधी निर्माण होऊन स्थलांतर थांबेल. त्यामुळे कुटुंबांची आर्थिक स्थिती सुदृढ होईल व गावाची अर्थव्यवस्था मजबूत होऊन विकासाचा वेग वाढेल, असा विश्वास ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार एस. ठेंगेकर यांनी व्यक्त केला. शासनाच्या योजना योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ग्रामस्थांनी ग्रामसभा, लोकसहभाग, श्रमदान व लोकवर्गणीद्वारे सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## अवघ्या २३व्या वर्षी नगरसेविका; खुशबू मेंढे ठरल्या सर्वांत तरुण चेहरा

प्रतिनिधी २७ डिसेंबर

**उमरखेड** : उमरखेड नगरपालिका निवडणुकीत २६ नगरसेवकांपैकी अवघ्या २३ वर्षांच्या खुशबू पवन मेंढे या सर्वांत तरुण नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. वडार समाजातून प्रथमच उच्चशिक्षित तरुण महिला नगरसेविका निवडून आल्याने हा निकाल सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा मानला जात आहे.



प्रभाग क्रमांक ८-अ मधून भाजपाच्या उमेदवार खुशबू मेंढे यांनी काँग्रेस (उबाठा) आघाडीच्या सुमनबाई बाभुळकर यांचा पराभव केला. उमरखेड शहरात सुमारे दोन हजारांहून अधिक वडार समाजातील मतदार असून, या समाजाला प्रथमच नगरपालिकेत तरुण व उच्चशिक्षित प्रतिनिधित्व मिळाले आहे. खुशबू मेंढे यांचे पती पवन मेंढे हे भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष असून, युवा कार्यकर्त्यांची संघटित ताकद आणि प्रभावी प्रचारयंत्रणा या विजयामागे निर्णायक ठरली. पॅनल टू पॅनल प्रचारावर भर देण्यात आल्याने प्रभाग क्रमांक ८ मधून भाजपाचे दोन्ही उमेदवार विजयी झाले. याच प्रभागातून नगराध्यक्षपदाच्या भाजप उमेदवाराला ३२१ मतांची आघाडी मिळाली.

विजयानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना खुशबू मेंढे म्हणाल्या की, "हा विजय भाजपाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांचा आहे. उमरखेडमधील वडार समाजाला न्याय मिळाल्याचा मला आनंद आहे." त्यांनी भाजपाचे नेते नितीन भुतडा, आमदार किसनराव वानखेडे, माजी आमदार, शहराध्यक्ष अतुल खंदारे तसेच सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. शहरातील विविध मूलभूत प्रश्नांवर काम करून जनतेची सेवा करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

> निवडून आलेल्या २६ नगरसेवकांपैकी खुशबू पवन मेंढे या सर्वांत कमी वयाच्या असून त्या बी.कॉम. पदवीधर आहेत. नगरपालिकेच्या सभागृहात त्या अभ्यासपूर्ण आणि ठाम भूमिका मांडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. २७ डिसेंबर २०२५




# पोकरातील भ्रष्टाचाऱ्यांना धडकी, पत्रकाराच्या परिवारास... जीवे मारण्याची धमकी !

***रिसोड पोलीसात तक्रार दाखल, कारवाई करण्याची मागणी * पोकरातील भ्रष्टाचाराची तालुक्यात खळबळ**

● खाजा शेख @ रिसोड ●

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पत्रकार वसंत खडसे यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची देण्यात आली आहे. या बाबत रिसोड पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून पत्रकार यांच्या पत्नीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. रिसोडचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी तक्रार दाखल करून घेत उचित कारवाई करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती सौ. अनिता वसंत खडसे यांनी दिली आहे.

प्राप्त माहितीनुसार शेलुखडसे येथील पत्रकार एका वृत्तपत्रात उपसंपादक म्हणून काम करत आहेत. अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणारे पत्रकार वसंत खडसे यांनी गेल्या काही दिवसांपासून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात 'पोखरा' योजनेमधील भ्रष्टाच्या बातम्यांची वृत्तमालिका सुरू करून सबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले होते. परिणामी पोकरा योजनेतील गैरप्रकाराला तोंड फुटले आणि संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. पत्रकार वसंत खडसे यांनी त्यासंदर्भात विविध बातम्या प्रकाशित करून वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वृत्त मालिका प्रकाशित केली होती. विशेष म्हणजे त्या संदर्भात पुराव्यानिशी राज्याचे मुख्यमंत्री व प्रधान सचिव आणि सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. त्या



अनुषंगाने त्यांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत. यावर वरिष्ठ तपास अधिकाऱ्यांची तपासाठी नेमणूक करण्यात आली आहे.

त्यानुसार तपास अधिकारी संतोष वाळके यांचे पथक शेलुखडसे येथे दि. २६ डिसेंबर रोजी चौकशीसाठी आले होते. तक्रारीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी ज्ञानेश्वर गजानन खडसे व संजय गजानन खडसे यांच्या गट नंबर ६०२ मधील नेटशेड व विविध घेतलेल्या लाभाची तपासणी केली आणि मयत स्व. गजानन निवृत्ती खडसे व त्यांच्या पत्नी लक्ष्मी गजानन खडसे यांच्या गट नंबर ६३३ मधील कथित फळबाग व वनीकरण आणि जुनी विहीर असताना देखील पोखरा योजनेतून घेतलेल्या नव्या विहिरीची पाहणी केली. त्या अनुषंगाने तपासाची नोंद करून सदर तपास अधिकारी पुढील तपासासाठी निघून गेले होते.

झालेला तपास व पोखरा योजनेतून घेतलेला अवैध लाभ अंगलट येणार असल्याचे लक्षात येताच ज्ञानेश्वर गजानन खडसे यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या पायाखालची वाळू सरकली. आणि त्यांच्या मनाचे संतुलन बिघडले. याच मनःस्थितीतून राग अनावर झाल्याने आरोपी संजय गजानन खडसे व त्याची आई गं.भा.श्रीमती लक्ष्मी गजानन खडसे यांनी त्यांच्या शेजारच्या शेतात काम करत असलेल्या पत्रकार वसंत खडसे यांच्या पत्नी सौ. अनिता वसंत खडसे यांना शिवीगाळ केली. तसेच पत्रकार वसंत खडसे यांनी विरोधात बातम्या प्रकाशित करून पोखरा योजनेतील भ्रष्टाचाराची तक्रार का केली ? असा प्रश्न उपस्थित करत सौ. अनिता वसंत खडसे यांना व त्यांच्या पतीला जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. पत्रकार वसंत खडसे वाशिमवरुन घरी परतले असता त्यांच्या पत्नीने घडलेली हकिगत त्यांना सांगितली. पत्रकार यांनी आपल्या पत्नीची समजूत काढून त्यांनी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रार दाखल करून घेत ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार श्री रंजवे पुढील तपास करीत आहेत.




## थोडक्यात

### य. च. महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन संपन्न




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात मा.चंद्रकांत ठाकरे, माजी अध्यक्ष, जि. प.वाशिम तथा सचिव, श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग,

तहसील कार्यालय, मंगरुळपीर व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर येथील सभागृहात करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री जुगलकिशोरजी कोठारी (जिल्हाध्यक्ष, अ.भा.ग्राहक पंचायत) हे होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. श्री अभयजी खेडेकर (विदर्भ प्रांत संघटन मंत्री, अ.भा.ग्राहक पंचायत) तथा प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री चंद्रकांतजी ठाकरे (माजी जिल्हा परिषद अध्यक्ष) तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे आणि विविध विभागांचे मान्यवर अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा . कावरे, प्रास्ताविक डॉ. अनंत शिंदे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांनी या पुढील काळात सुद्धा आम्हाला विविध कार्यक्रम आयोजन करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी असे मत व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता डॉ. अनंत शिंदे , प्रा. मनवर, राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी, प्रा. धनजकर, कनिष्ठ विभागातील प्रा. कावरे, प्रा. सुर्वे, प्रा. डोळेवार, प्रा.भगत प्रा.अलोने प्रा.कडू मॅडम, विलास गावंडे, संतोष, ठोकळ, अतुल भोयर, किशोर गावंडे, रवी राठोड, सुरेश कंकाळ, राजू आवारे इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

### एमआयएम पक्षाच्या केनवड सर्कल अध्यक्षपदी पप्पू शाह यांची निवड



● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

रिसोड तालुक्यातील केनवड सर्कल अध्यक्षपदी AIMIM पक्षाच्या वतीने पप्पू शाह यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड प्रदेश उपाध्यक्ष हाजी युसुफ सेठ पुंजानी यांच्या हस्ते झाली. यावेळी जिल्हाध्यक्ष आसिफ भाई व सैय्यद रहेबर भाई यांची प्रमुख उपस्थिती होती. दिनांक २६ डिसेंबर रोजी कारंजा येथील पक्ष कार्यालय दारुसल्लाम येथे पप्पू शाह यांनी AIMIM पक्षात प्रवेश केला. यावेळी केनवड सर्कल, कारंजा व परिसरातील मोठ्या संख्येने पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.दरम्यान, कारंजा नगरपरिषद निवडणुकीतील यशाबद्दल प्रदेश उपाध्यक्ष हाजी युसुफ सेठ पुंजानी तसेच नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल बिलाल पुंजानी यांचा सत्कार करण्यात आला. पप्पू शाह यांच्या निवडीमुळे केनवड सर्कलमध्ये पक्ष संघटन अधिक मजबूत होईल व युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# सनगाव येथील एडणी तलावात मामासह दोन भाच्यांचा बुडून मृत्यू !

## गावात शोककळा: 'सर्च ऑपरेशन' राबवून मृतदेह काढले बाहेर

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपीर तालुक्यातील सनगाव येथील शेत परिसरातील एडणी तलावात मासे व खेकडे पकडण्यासाठी गेलेल्या मामासह दोन अल्पवयीन भाच्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवार, २६ डिसेंबर रोजी उघडकीस आली. यामुळे संबंधितांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले असून, परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आहे.


याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण राजू बनसोड (२८, रा. गुरुकृपा कॉलनी, मंगरुळपीर) यांनी आसेगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार, सिद्धार्थ मोहन बनसोड (३५), अंकुर राजेंद्र भालेराव (१५) आणि कार्तिक राजेंद्र भालेराव (१२) हे तिघेही २५ डिसेंबर रोजी दुपारी सनगाव शेतशिवारातील तळ्यात मासे व खेकडे पकडण्यासाठी गेले होते; मात्र तळ्याच्या खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तिघांचाही बुडून मृत्यू झाला.

**गावात शोककळा**

मामासह दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाल्याने सनगाव गावात शोककळा पसरली आहे..

एकाच कुटुंबातील तिघांचा बळी गेल्याने तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. सिद्धार्थ बनसोड ,कार्तिक भालेराव, अंकुर भालेराव, सनगाव येथील तळ्यात शोध मोहीम राबविताना आपत्कालीन बचाव पथक.





**गावकऱ्यांकडून गुरुवारी रात्री शोधकार्य!**

तिघेही घराबाहेर गेल्यानंतर घरी न परतल्याने कुटूंबियांसह ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली.

यावेळी एडणी तलावाजवळ कपडे आणि काही साहित्य आढळून आल्याने अनर्थ झाल्याची शंका बळावली. ही माहिती तत्काळ आसेगाव पोलिस ठाण्याला देण्यात आली. गुरुवारी रात्री उशिरापर्यंत मृतदेहांचा शोध घेण्यात आला; मात्र तळ्याची खोली सुमारे १५ फूट असून, मृतदेह चिखलात अडकल्याने शोधकार्यात अडचण निर्माण झाली.

**आपत्कालीन बचाव पथकास पाचारण**

घटनेची गंभीरता लक्षात घेऊन तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांनाही माहिती देण्यात आली. त्यांच्या निर्देशानुसार पिंजर येथील संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकास घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

शुक्रवारी सकाळी घटनास्थळी दाखल झालेल्या पथकाने लोकेशन ट्रेस करून सर्च ऑपरेशन हाती घेतले. एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर तळ्याच्या खोल पाण्यातून तिन्ही मृतदेह बाहेर काढण्यात पथकास यश आले. ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन बचाव पथकाकडून मृतदेह बाहेर काढल्यानंतर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर तिन्ही मृतदेहांवर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द करण्यात आले.

**प्रशासन व पोलिसांचा समन्वय**

संपूर्ण घटनेदरम्यान आसेगावचे ठाणेदार रामकृष्ण भाकडे यांच्यासह अन्य पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी तळ ठोकला.

शोधमोहीम व पुढील प्रक्रियेसाठी महसूल प्रशासनाशी समन्वय साधण्यात आला. तक्रारीनुसार आसेगाव पोलिस ठाण्यात याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

# खुल्या जागेवर अतिक्रमण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

एकात्मीक शहर योजनेतील अभिसयोजनाच्या भुखंड क्रमांक ७८ च्या आजू बाजू च्या खुल्या जागेवर अवैधरित्या अतिक्रमण केले आहे. या जागेतील अतिक्रमण नगर पालिकेने तातडीने काढण्याची मागणी मधुसूदन हरिनिवास काकाणी यांनी निवेदनाद्वारे न.प. मुख्यधिकाऱ्यांना केली आहे.

निवेदनानुसार संबंधित भूखंड हा २००९ रोजी नगर पालिकेकडून नोंदणीकृत कागदपत्राने घेतला असून नगर परिषदेकडे सर्व नियमानुसार कर व भाडे नियमित भरले आहेत. तथापी भुखंडाच्या पुर्व - उत्तर, दक्षीण दिशेने खुली रहिवाशी जागा असून पश्चिमेला १८ फुटाचा रस्ता आहे. या खुल्या



जागेत काही व्यक्तींनी भाडे लावण्याच्या नावाखाली अतिक्रमण केले असून त्यातून हा रस्ता बंद होण्याच्या मार्गावर आहे. शिवाय खुल्या जागेतही अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे या जागेवरील अतिक्रमण हटवूण रस्ता मोकळा करावा अन्यथा न्यायालयात जागे लागेल, असा इशाराही निवेदनाद्वारे मधुसूदन काकाणी यांनी दिला आहे.

# राष्ट्रीय ग्राहकदिनानिमित्त वाशिम येथे संयुक्त कार्यक्रम

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम तहसील येथील नवीन सभागृहात २४ डिसेंबर २०२५ रोजी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशिम, जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा शाखा), जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हा विधिज्ञ संघ, वाशिम व तहसील कार्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्राहकदिन उत्साहात साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशिम – जुगलकिशोर कोठारी होते. व्यासपीठावर अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम – व्ही. आर. गावंडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम – व्ही. जी. चौखंडे, अध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ संघ, वाशिम – अनुप बाकलीवाल, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, वाशिम – भारती सोनटक्के, मुख्य लोक अभिरक्षक, वाशिम – परमेश्वर शेळके, तहसीलदार, वाशिम – निलेश पळसकर, सदस्य, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम – नागेश उबाळे, नायब तहसीलदार, वाशिम – साहेबराव नप्ते तसेच निरीक्षण अधिकारी, वाशिम – मनोज लटारे उपस्थित होते.यावेळी जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशिम – जुगलकिशोर कोठारी, अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम – व्ही. आर. गावंडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम – व्ही. जी. चौखंडे व अध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ संघ, वाशिम – अनुप बाकलीवाल यांची समायोजित मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथींनी ग्राहक संरक्षण कायदे, ग्राहकांचे हक्क तसेच तक्रार निवारण प्रक्रियेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्य लोक अभिरक्षक, वाशिम – परमेश्वर शेळके यांनी केले, तर आभार प्रदर्शन तहसीलदार, वाशिम – निलेश पळसकर यांनी केले. कार्यक्रमास अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे पदाधिकारी व सदस्य, स्वस्त धान्य दुकानदार तसेच तालुक्यातील विविध विभागांचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धरण गाळमुक्त, शिवार गाळयुक्त !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वारंवार जाणवणारी पाणीटंचाई, कमी होत जाणारी भूजल पातळी आणि शेतीसमोरील आव्हाने लक्षात घेता शासनाने गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार हे महत्त्वाकांक्षी अभियान सुरू केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून धरणे, तलाव, बंधारे व इतर जलसाठ्यांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ काढून जलसाठ्यांची साठवण क्षमता वाढविणे आणि तोच सुपीक गाळ शेतजमिनीत वापरून शेतीची उत्पादकता वाढविण्याचा दुहेरी उद्देश साध्य करण्यात येणार आहे.

या अभियानामुळे जलसाठ्यांतील गाळ काढून टाकल्याने पावसाचे पाणी अधिक प्रमाणात साठवणे शक्य होऊ शकेल. परिणामी धरणांची पाणी साठवण क्षमता वाढून सिंचनासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्धता सुधारण्यासाठी मदत होणार आहे. सुपीक गाळ शेत शिवारात टाकण्यात येत असल्याने जमिनीची पोत सुधारून, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते आणि उत्पादनक्षमता लक्षणीयरीत्या वाढेल. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होऊन शाश्वत शेतीला चालना मिळणार आहे.

**जलसंधारणातून शाश्वत शेतीकडे वळूया**



गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार हे अभियान जिल्ह्यातील जलसुरक्षा मजबूत करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरणार आहे. जलसाठ्यांमधील साचलेला गाळ काढल्यामुळे धरणांची साठवण क्षमता लक्षणीयरीत्या वाढत असून पावसाचे पाणी अधिक प्रमाणात अडविणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर हा सुपीक गाळ शेतकऱ्यांच्या शिवारात वापरल्याने जमिनीची गुणवत्ता सुधारून शेती उत्पादनात वाढ होऊ शकते. जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली सर्व यंत्रणा, ग्रामपंचायती आणि शेतकरी यांच्या सक्रिय सहभागातून हे अभियान यशस्वीपणे राबविले जात आहे. लोकसहभागाच्या बळावर जलसंधारणाची कामे पूर्ण करून दुष्काळमुक्त व समृद्ध जिल्हा घडविण्याचा आमचा संकल्प आहे.

**जिल्हा जलसंधारण अधिकारी श्याम फेरवानी**

'गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार' हे अभियान लोकसहभागावर आधारित असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. जिल्हा प्रशासन, जलसंधारण विभाग, ग्रामपंचायती, शेतकरी, स्वयंसेवी संस्था व यंत्रणांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. लोकसहभागातून कामे झाल्याने शासनाचा खर्च कमी होतो तसेच कामांची गती आणि गुणवत्ता वाढेल. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेत जलसाठे गाळमुक्त करण्यासाठी सहकार्य करत आहे. या अभियानामुळे केवळ शेतीच नव्हे तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. पाण्याची उपलब्धता वाढल्याने दुबार पिके घेणे शक्य होत असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. तसेच भूजल पातळी उंचावल्याने विहिरी, बोअरवेल यांना दीर्घकाळ पाणी उपलब्ध राहु शकते. पर्यावरणीय समतोल राखत दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी हे अभियान अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. एकूणच 'गाळमुक्त धरण – गाळयुक्त शिवार' हे अभियान जलसंधारण, शेती विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा सुंदर संगम साधणारे आहे. पाणी म्हणजे जीवन हे सूत्र प्रत्यक्षात उतरवत, भावी पिढ्यांसाठी जलसुरक्षित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने हे अभियान एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

**अनिल कुरकुटे,**
जिल्हा माहिती कार्यालय वाशिम

# कोल्हापूरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये होणार रूपांतर!

**तत्त्वता: मान्यतेचा प्रस्ताव, पाटबंधारेच्या संचालककडे सादर**

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड तालुक्यातील मसलापेन को. प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतरण करणे, तसेच बालखेडा धोडप भापूर करिता असलेला तत्वतः मान्यतेचा प्रस्ताव कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर यांचे कडुन अतिरिक्त मुख्य सचिव, जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला, आहे , बॅरेजकरिता लागणारे पाणी हे मसलापेन को.प. बंधाऱ्याचे १.१३ दलघमी व रद्द झालेल्या कळमगव्हाण ल.पा. योजनेचे २.७४४ दलघमी असे एकुण ३.८७४ दलघमी उपखोऱ्यामध्ये उपलब्ध आहे.



वाशिम जिल्हा हा आकांक्षित जिल्हा असून वाशिम जिल्ह्यामध्ये कुठल्याही सिंचनाचा मोठा प्रकल्प उपलब्ध नाही त्यातल्या त्यात रिसोडमध्ये तर मोठा प्रकल्प नसल्याकारणाने कायम रिसोड तालुका सिंचनच्या दृष्टीने दुर्लक्षित आहे मागील अनेक वर्षापासून आम्ही पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळावे याकरिता प्रयत्न करीत आहोत. रिसोड तालुक्यातील प्रकल्पाकरिता मसला पेन बॅरेज करिता प्रकल्पास पाणी उपलब्ध असुन तत्वतः मान्यता मिळाल्यास रिसोड तालुक्यास ९०० हे. सिंचनाचा लाभ मिळणार आहे व रिसोड तालुक्यातील मसला पेन धोडप भापूर बालखेड मॅरेजेसचा प्रश्न मार्गी लागेल करिता विदर्भाचे पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक सोनटक्के यांना प्रत्यक्ष नागपूर येथील कार्यालयात भेट घेऊन चर्चा केली लवकरच सदर प्रस्ताव मुख्यमंत्री , व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे यांच्याकडे पाठवून, पाठपुरावा करून लवकरात लवकर तत्वतः मान्यता मिळवून देण्या चे लखनसिंह ठाकुर यांना आश्वासित केले.

# ॲग्रोटेक कृषी प्रदर्शनीचे उद्‌घाटन

प्रतिनिधी २७ डिसेंबर

♦ २७ ते २९ डिसेंबर कृषी प्रदर्शन आयोजित



**अकोला :** कृषी क्रांतीचे प्रणेते स्व.डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन '?ग्रोटेक २०२५' चा आज मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत शुभारंभ झाला. ५५० हून अधिक स्टॉल्सच्या माध्यमातून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना येथे मिळत आहे.

२७ डिसेंबर रोजी सकाळी ११:०० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मैदानावर महाराष्ट्र राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख उपस्थित होते. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, ?डॉ. इंद्रमणी कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, डॉ. नितीन पाटील कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, ?विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य, केंद्रीय व राज्यस्तरीय संस्थांचे संचालक आणि जिल्ह्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. दीपप्रज्वलन आणि डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले.

सर्व पाहुण्यांचे स्वागत शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आले. २७ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित या प्रदर्शनात कृषी प्रदर्शन, कृषी महोत्सव, पुष्प प्रदर्शन, पशु प्रदर्शन आणि विविध चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. 'शाश्वत शेती आणि समृद्ध शेतकरी' ही संकल्पना या प्रदर्शनाच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे. 'शेतकऱ्यांनी आपली शेती अधिक समृद्ध करण्यासाठी या प्रदर्शनाचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा,' असे आवाहन कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी यावेळी केले.

कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी देखील विदर्भासह इतर राज्यातील शेतकरी, युवक-युवती, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि प्रगतशील शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन केले. उद्‌घाटन सोहळ्यानंतर सर्व पाहुण्यांनी स्टॉल्सला भेट देऊन प्रदर्शनाची पाहणी केली.

प्रदर्शनात चार भव्य डोम उभारण्यात आले असून त्यात ५५० हून अधिक स्टॉल्स आहेत. विविध कृषी विद्यापीठांचे प्रगत तंत्रज्ञान, ड्रोन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कृषी उपाययोजनांचे सादरीकरण तसेच कृषी पदवीधर उद्योजकांचे दालन, स्वयंसहायता बचत गटांनी तयार केलेली उत्पादने आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल्स हे विशेष आकर्षण ठरत आहेत.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यस्मरण महोत्सवाला आरंभ

प्रतिनिधी २७ डिसेंबर



**अकोला :** अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुल अंतर्गत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समिती अकोला द्वारा आयोजित महाराजांच्या ५७ वा पुण्यस्मरण महोत्सव २७ २८ डिसेंबर रोजी जिल्हा परिषद कर्मचारी भवन आकाशवाणी समोर येथे आयोजित करण्यात आला आहे.

यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार २७ डिसेंबर रोजी पुण्यस्मरण महोत्सवानिमित्त शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. विविध मार्गाने फिरून कार्यक्रम स्थळी शोभायात्रीची सांगता झाली. दुपारी महोत्सवाचे उद्‌घाटन प्रकाश महाराज वाघ यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष उद्योजक अन्नपूर्णेच पाटील, तर अध्यक्षस्थानी प्रभात किड्सचे संचालक डॉ. गजानन नारे होते. यानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये पहाटे सहा ते सात सामुदायिक ध्यान ध्यानाची चिंतन डॉक्टर अजय उपाध्याय गायत्री परिवार हे करतील तसेच कार्यक्रमाला खासदार अनुप धोत्रे आमदारांनी सावरकर गुरुदेव सेवाश्रम चे आचार्य हरिभाऊ वेरुळकर माजी मंत्री गुलाबराव गावंडे आमदार वसंत खंडेलवाल गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन बोथे आमदार नितीन देशमुख आमदार साजिद खान पठाण सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराज आमदार हरीश पिंपळे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बालमुख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे रविवार २८ रोजी महोत्सवाचा समारोप होईल अशी माहिती देण्यात आली.



# एम स्क्वेअर कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर गायडन्स सत्र यशस्वीपणे संपन्न

प्रतिनिधी २७ डिसेंबर

♦ दहावी नंतर काय या प्रश्नाचे उत्तर आयोजनाद्वारे देण्यात आले






**अकोला :** २४ डिसेंबर रोजी येथील एम स्क्वेअर कोचिंग क्लासेस कडून खंडेलवाल भवन येथे पालक आणि विद्यार्थ्यांसाठी करिअर गायडन्स सत्र आयोजित करण्यात आले. या सत्राला विद्यार्थी व पालक यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. करिअर दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे हा उद्देश होता.

दहावी नंतर काय करायचे हा पालकांना आणि विद्यार्थ्यांना असलेला प्रश्न, त्याबद्दल येथे प्राध्यापक राजेश जोध सर, प्राध्यापक अंकित अग्रवाल सर तसेच प्राध्यापक मयंक थानवी सर यांच्याद्वारे बहुमोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच कॉमर्स, सीए, सीए फाउंडेशन तसेच एनआयओएस या नवीन कोर्स बद्दल संस्थेचे संचालक मयंक अनिल थानवी सर द्वारा सांगण्यात आले. हा कोर्स महाराष्ट्र बोर्ड व केंद्रीय बोर्डचे सर्वच विद्यार्थी करू शकतात. व स्वतः मयंक थानवी सरांनी हा कोर्स आपल्या इन्स्टिट्यूट मध्ये विद्यार्थ्यांसाठी यावर्षीपासून सुरू केलेला आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कुलींग भारत सरकारची एक स्वायत्त संस्था आहे. एनआयओएस अभ्यासक्रम सीबीएससी, आयसीएससीच्या समकक्ष मानला जातो आणि देशातील बहुतेक विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी वैध आहे. या कोर्स मध्ये बोर्डची परीक्षा दोन वर्षांमध्ये पूर्ण करायची असते. हे सत्र पालक आणि विद्यार्थ्यांसाठी अतिशय फायद्याचे ठरले अशी पालकांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

# कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये 27 व 28 डिसेंबर रोजी विशेष कॅंपचे आयोजन

**कोणत्याही व्याधीपासून काही मिनिटांत मिळवा सुटका**

प्रतिनिधी २७ डिसेंबर





**अकोला :** आजच्या गतिमान युगात प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या व्याधीने त्रस्त आहे. महागडी औषधे घेऊनही अनेक रुग्णांना आराम मिळत नाही. स्नायू, सांधे, गुडघे, कंबरदुखी इत्यादी त्रासाने त्रस्त असलेल्या रुग्णांना तात्काळ आराम मिळवून देण्यासाठी, शहरातील 'कमाल वेदना निवारण केंद्र' मध्ये २७ आणि २८ डिसेंबर रोजी आयोजित कॅंपचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

नेचरोपॅथी, ॲक्युथेरपी आणि कायरोप्रॅक्टिक उपचार पद्धतीनंतर कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये फक्त पंधरा ते वीस मिनिटांत वेदनेतून आराम मिळतो, असा दावा आग्रा येथील सुप्रसिद्ध बी.ई.एम.एस. नेचरोपॅथी व कायरोप्रॅक्टिक तज्ज्ञ डॉक्टर तरुण यादव आणि थेरपिस्ट डॉ. उदेन खान यांनी केला आहे. गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, मणक्याच्या हाडामध्ये गॅपमुळे होणारी वेदना, हात-पायांना मुंग्या येणे, पायात पेटके येणे, मायग्रेनचा त्रास, छातीत दुखणे, पायांची जळजळ, अंगदुखी, मणक्याच्या हाडात गॅप, हात उचलता न येणे, हातामध्ये पेटके येणे किंवा शरीरात कोठेही वेदना असल्यास, या सर्व जुन्या दुखण्यांपासून मुक्ती मिळते. डॉ. तरुण यादव यांच्या मदतीने येथे एक ते दहा वर्षांपर्यंतच्या जुन्या वेदनेपासून केवळ १५ ते २० मिनिटांत पूर्णपणे आराम मिळू शकतो. आतापर्यंत डॉ. तरुण यादव यांनी शेकडो रुग्णांवर उपचार करून त्यांना रोगमुक्त केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक मोठे राजकारणी, उद्योगपती आणि सामाजिक संघटनांनी त्यांचा सत्कार केला आहे. २७ आणि २८ डिसेंबर रोजी आयोजित कॅंपचा लाभ घेण्याचे आवाहन रुग्णांना करण्यात आले आहे. महिलांसाठी येथे स्वतंत्र व्यवस्था आहे आणि ऑनलाईन नोंदणीची सोय देखील उपलब्ध आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कृपया खालील मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा: मोबाईल क्रमांक: ८६२३८८८४४३ तसेच ९०४९८३१५७३.

# बाजारात मटार आणि हरभऱ्याची मोठी आवक

♦ भाव देखील बऱ्यापैकी घसरलेले दिसतात



प्रतिनिधी २७ डिसेंबर


**अकोला :** शहरात थंडीचा कडाका वाढताच बाजारपेठेत मटार आणि ओल्या हरभऱ्याची मोठ्या प्रमाणावर आवक वाढली आहे. मात्र, दुसरीकडे उसाची आवक घटल्याने त्याच्या किमतीत तेजी दिसून येत आहे.

सध्या बाजारपेठेत हिरवा मटार, ओला हरभरा आणि ऊस मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी उपलब्ध आहे. आगामी पौष महिना आणि मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर दानधर्मासाठी या वस्तूंना मोठी मागणी असते. यामुळे या साहित्याच्या दरात चढ-उतार पाहायला मिळत आहेत. यंदा पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याचा थेट परिणाम उसाच्या आवकेवर झाला असून पुरवठा कमी झाला आहे. ग्राहकांकडून उसाला मोठी मागणी असल्याने बाजारपेठेत भाव वधारले आहेत. ऊस विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार दर्जेदार ऊसाची जोडी १०० ते १८० रुपए, साधारण जोड़ी ७० ते १२० रुपए, हिरवा मटार ४० ते ६० रुपए किलो तर हरभरा ३० ते ६० रुपए किलो प्रमाणे विकला जातो आहे.

## हमी दराने सव्वा चार लाख क्विंटल कापूस खरेदी !

**अकोला :** हमी दराने कापूस खरेदीच्या जिल्ह्यातील नऊ केंद्रांवर आवक वाढली आहे. २२ डिसेंबरपर्यंत ४ लाख २२ हजार क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे. सी सी आय मार्फत जिल्ह्यातील चिखलगाव, बोरगावमंजू, अकोट १, अकोट २, चोहोट्टाबाजार, तेल्हारा, पारस, बार्शिटाकळी व मूर्तिजापूर या नऊ केंद्रांवर हमी दराने कापूस खरेदी करण्यात येत आहे. ८ हजार १० रुपये ते ८ हजार ६० रुपये प्रतिक्विंटल हमी दराने कापूस खरेदी करण्यात येत असून, केंद्रांवर कापसाची आवक वाढली आहे. या पार्श्वभूमीवर २२ डिसेंबरपर्यंत जिल्ह नऊ खरेदी केंद्रांवर १८ हजार शेतकऱ्यांकडून ४ लाख २२ हजार वि कापूस खरेदी करण्यात आला आहे, माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या सूत्रांनी दिली.

# महाराजा अग्रसेन चौक ते रेल्वे स्टेशन रस्त्याचे सौंदर्यीकरण सुरू



प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अकोला :** रेल्वे स्टेशन पासून महाराजा अग्रसेन चौका पर्यंत रस्त्याचे सौंदर्यीकरण करण्यात येत आहे. शहरातील मुख्य मार्ग असल्याने त्याकडे लक्ष देणे आवश्यक होते. आता कामे सुरू झालेली दिसतात. त्यामुळे परिसराला देखणे रूप निश्चितच प्राप्त होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरातील विविध चौकात यापूर्वी देखील सौंदर्यस्थळे उभारली होती. परंतु आता त्याचे अस्तित्व जाणवत नाही. तसे या रस्त्याबाबत होऊ नये असे नागरिक बोलत आहेत. तसेच हा रस्ता तर अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे सौंदर्यीकरण व्यवस्थित व्हावे तसेच ते टिकून राहणे आवश्यक आहे. नाही तर काम होऊन काही दिवस होत नाही तोच रया गेलेली दिसते. या कामाबाबत तसे होणार नाही याकडे संबंधित यंत्रणेने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

# राजेश्वर सेतू रस्ता दुरुस्तीला सुरूवात

♦ हा रस्ता ठिकठिकाणी उखडला होता



प्रतिनिधी २७ डिसेंबर

**अकोला :** खोलेश्वर मधून राजेश्वर सेतूकडे जाणारा रस्ता होता. परंतु सरकारी बगिचा कडून नवीन रस्ता उपलब्ध झाल्यामुळे रहदारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. मात्र पुलावरील रस्ता ठिकठिकाणी उखडला होता तसेच काही ठिकाणी खड्डे पडले होते. त्यामुळे रस्ता दुरूस्तीची मागणी होती. अखेर रस्ता दुरूस्तीला सुरूवात झाली आहे. जुन्या आणि नवीन शहराला जोडणारा राजेश्वर सेतू तत्कालीन आमदार कै. गोवर्धन शर्मा यांच्या पुढाकाराने निर्माण झाला. शहरवासीयांची त्यामुळे सोय झाली आहे. खोलेश्वर आणि हरिहरपेठचे अंतर कमी झाले. या मार्गावरील वाहतूक पाहता रस्ता खूप खराब झाला होता. नागरिकांना त्रास होऊ लागला तरी यंत्रणा जागी झाली नाही. परंतु आता काम सुरू झाले आहे.

# 31 डिसेंबर रोजी श्रींचे मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले

♦ नवीन वर्षाला श्रींचे दर्शन घेण्यासाठी हजारो भक्त शेगावात दाखल

प्रतिनिधी २७ डिसेंबर



**शेगाव:** नवीन वर्षाची सुरुवात श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनाने करण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून लाखो भक्त दोन दिवस आधीच संत नगरीत दाखल होतात. भाविकांची ही वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर व्यवस्थापन समितीने ३१ डिसेंबर रोजी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

३१ डिसेंबरच्या रात्री शेगावमध्ये पोहोचून नवीन वर्षाची सुरुवात महाराजांच्या दर्शनाने करणाऱ्या हजारो भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी मंदिर प्रशासन सज्ज झाले आहे. नाताळच्या सुट्ट्या आणि नवीन वर्ष: ख्रिसमसच्या सुट्ट्या आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन, बुधवार ३१ डिसेंबर रोजी समाधी मंदिर रात्रभर उघडे राहील. यामुळे रात्री उशिरा येणाऱ्या भाविकांना पहाटे श्रींचे दर्शन घेऊन आणि महाप्रसाद घेऊन नवीन वर्षाचा आनंद साजरा करता येईल.

विशेष म्हणजे, नवीन वर्षाच्या सुरुवातीला भाविकांना पालखी दर्शनाचा लाभही मिळणार आहे. ३० डिसेंबर (दशमी): श्रींची पालखी मंदिर परिक्रमा निघेल. ३१ डिसेंबरला पुत्रदा भागवत एकादशी, १ जानेवारी नवीन वर्षाचा पहिला दिवस आणि गुरुवार असल्याने श्रींची पालखी मंदिर परिक्रमा काढली जाईल.

# हॉटेल द ग्रॅंड जलसा येथे 'न्यू इयर 2025' पार्टीचे आयोजन

प्रतिनिधी २७ डिसेंबर

♦ सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे धमाकेदार स्वागत




& EVENT MINISTRY PRESENT'S

**अकोला :** कापूस नगरी म्हणून ओळखले जाणारे अकोला शहर सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. अकोल्यातील हॉटेल आणि रेस्टॉरंट मालकांनी ३१ डिसेंबरच्या सेलिब्रेशनसाठी कंबर कसली आहे. शहरातील रिधोरा रोडवरील 'हॉटेल द ग्रॅंड जलसा' येथे श्री इव्हेंट मॅनेजमेंट आणि इव्हेंट मिनिस्ट्री प्रस्तुत 'न्यू इयर २०२५ पार्टी'चे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचा जास्तीत जास्त अकोलेकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात येत आहे.

३१ डिसेंबर रोजी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी 'हॉटेल द ग्रॅंड जलसा'मध्ये यंदा विशेष 'न्यू इयर मेनू' तयार करण्यात आला आहे. यामध्ये विविध प्रकारचे स्टार्टर्स आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या चविष्ट व्यंजनांची रेलचेल असेल. अकोलेकर आपल्या खाद्य संस्कृतीसाठी ओळखले जातात, हीच बाब लक्षात घेऊन या पार्टीचे नियोजन करण्यात आले आहे.

मुख्य प्रायोजक पीर्च ड्रीप अँड डाईन आहेत. हॉटेलमध्ये मर्यादित 'स्पेशल गेझेबो' डिझाइन करण्यात आले आहेत, जिथे विशेष पाहुण्यांसाठी बसण्याची सोय असेल.

वाढती गर्दी लक्षात घेता बाऊन्सर्स, सीसीटीव्ही आणि अतिरिक्त पार्किंगची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. तरुणाईसाठी नामांकित डीजे आणि लाईव्ह म्युझिक बॅंड आमंत्रित करण्यात आले आहेत. तसेच सोशल मीडियासाठी खास सेल्फी झोन आकर्षण ठरणार आहे. या सोहळ्याला अधिक भव्य बनवण्यासाठी खालील संस्थांचे सहकार्य लाभले आहे. फूड पार्टनर लालजी केटरर्स, लाईट व साऊंड पार्टनर गुलाब साऊंड अँड डेकोरेटिव्ह सर्व्हिस, एसएफएक्स पार्टनर: श्री रिक्रिएशन, मीडिया पार्टनर आरआरसी न्यूज सर्व्हिस आहे.यंदा कडाक्याची थंडी असूनही नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

कुटुंबांसाठी येथे विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अविस्मरणीय रात्रीचा आनंद घेण्यासाठी आपले पासेस आजच बुक करा. संपर्क ठिकाण मोहित सेल्स, एलआरटी कॉलेज जवळ, अकोला. मोबाईल क्रमांक ७५५८४४३०९२, ७०७११९१९१९, ८४३३५०५८६८ आहे.






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135